# नशीब बलवत्तर म्हणून

अंदाजे एकोणीस वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी मी अंधेरीला नोकरीस होते व बोरीवलीला रहात होते. एके दिवशी ऑफिसमधून सात - साडेसातला निघाले. माझ्याबरोबर माझ्या सहकारी मैत्रिणी होत्या. मी काम करीत असणारी कंपनी सुरेन रोड, अंधेरी येथे होती. तिथून बसने स्टेशनला जावे लागे. मी व माझ्या मैत्रिणी बसने अंधेरी स्टेशनला आलो. बस सिग्नलला थांबली होती. मी सिग्नलला बस थांबली असताना कधीही बसमध्ये चढत नाही किंवा बसमधून उतरत नाही. पण त्यादिवशी उशीर झाला होता. नेहमी पाच वाजता आम्ही घरी जाण्यास निघायचो. गर्दीच्या ट्रेनमध्ये कसे चढायचे ह्या विचारात व घरी गेल्यावर करायला लागणारी कामाची यादी डोळ्यासमोर होती त्यामुळे मी सिग्नला बस थांबल्यावर बाचकतच इतर प्रवाशांबरोबर उतरले. माझ्याबरोबर इतर मैत्रिणीसुद्धा उतरल्या..मी बसमधून उतरले आणि बस चालू झाली.

माझा पाय माझ्याच पायजम्यात अडकला. रस्त्याच्या बाजूला खडी पडली होती. अंधार असल्यामुळे मला नीटसे दिसले नाही. तोल न सांभाळता आल्यामुळे मी रस्त्यावरच्या खडीवर उताणी पडली..पण त्याचवेळी रस्त्यावरून जाणारी एक वयस्कर स्त्री माझ्या पडण्यामुळे अडखळली व ती सुद्धा माझ्या अंगावर पडली..अकस्मात माझ्या अंगावर तिचे पडणे त्यामुळे मला गांगरल्यासारखे झाले. मला धडपणे नीट उठता येईना. सिग्नल समोरच एक हॉटेल होते. रस्त्यावरील लोकांनी आधार देऊन मला व त्या वयस्कर स्त्रीला उठण्यास मदत केली. हॉटेल मधून पाणी आणून दिले.

डोक्याला मुका मार लागला होता. प्रचंड वेदना होत होत्या. तशाच स्थितीत ट्रेनने बोरीवलीला आले. सोबत मैत्रिणी होत्या. डोक्याचा पाठचा भाग सुजू लागला. कशीबशी घरी पोहोचले. यजमानांबरोबर डॉक्टरांकडे गेले. वेदनाशामक गोळ्या घेतल्यावर तात्पुरते बरे वाटले. पण काही दिवसांनंतर प्रचंड कळा डोक्यात येऊ लागल्या. कॉम्प्युटरवर काम करताना अंधुक दिसायला लागले. तेव्हा न्यूरोलॉजिस्टचा सल्ला घ्यावा लागला. डोक्यावर पडल्यामुळे आघाताने एक नस दाबली गेली होती. त्यामुळे मला चक्कर व अंधुक दिसणे, डोकेदुखीचा त्रास पुन्हा सुरू झाला होता. सहा महिन्यांसाठी औषधे घेतल्यावर सर्व त्रासातून मुक्ती मिळाली.

मी बस मधून सिग्नलला उतरताना खडीवर पडले पण त्यावेळी बाजूने एखादे वाहन आले असते तर? कल्पनाच करू शकत नाही. थोडक्यात निभावले. देव तारी त्याला कोण मारी ? पण ह्या प्रसंगानंतर मी पुन्हा कधीही सिग्नलला बसमधून उतरण्याचे नसते धाडस केले नाही. इतरांनीही अशी चूक करू नये असे मला मनापासून वाटते. प्रत्येक वेळी आपले नशीब आपल्याला साथ देईलच असे नाही.

**दर्शना प्रभूतेंडोलकर**